**MHWS080010642026**

<u>**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११२/२०२६ राजकुमार वि. सरकार मधील नि. क्र.०१ वरील**</u>

<u>**आदेश**</u>

**०१.** अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ५०३ अन्वये जप्त मुददेमालाचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारातर्फे असे कथन करण्यात आले आहे की, यातील अर्जदार याच्या मालकीचे वाहनाचे वर्णन खालील प्रमाणे – HONDA CB SHINE कंपनीची दुचाकी असून जिचा रजि.क्र. MH-37-N-7949, चेसिस क्र. ME4JC36KCE7407912, इंजिन क्र. JC36E73334633.

**०३.** वर नमुद वर्णनाचा मुद्देमाल पो.स्टे. रिसोड यांनी गुन्हा रजिस्टर क्र.२५२/२०२६ कलम ३०३ (२) अंतर्गत जप्त केलेले आहे. सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे आहे. सदर जप्त वाहन हे पोलीस स्टेशन आवारात उघड्यावर पडलेली असून ती चालविण्याच्या स्थितीत राहणार नाही. तसेच नमूद गाडीचे भाग निकामी होतील. सदर गाडीची अर्जदारास नितांत आवश्यकता असल्याने जप्त वाहनाचा ताबा मिळण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०४.** तपासी अधिकारी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले की, सदर गुन्हयाचे तपासात CCTV फुटेज तपासून गुप्त बातमीदारामार्फत शोध घेउन वर नमूद दुचाकी जप्त करण्यात आली आहे. सदर वाहनाचे कागदापत्र् प्राप्त केले असता श्रीराम फायनान्स कपनीचे नो ऑबजेक्शन लेटर फॉर्म नं. ३५, आर.सी. बुक असे कागदपत्रे असून वाहनाचे इंन्शुरंन्स सादर केलेले नाही. करिता वि.कोर्टाच्या योग्य तो आदेश होण्यास विनंती केली आहे. सहायक सरकारी

अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे मांडून सदरचा जप्त वाहन हे गुन्हयाचे कामी पुरावा असल्याने व अर्जदार त्यामध्ये बदल करण्याची शक्यता असल्याने योग्य तो न्यायीक आदेश पारीत करावा अशी विनंती केली.

**०५.** अर्जदाराचे वकील श्री. ए.एस. झनक यांचा तसेच अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकिल श्री.एम.डी. अडकिने यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** अर्जदाराने सदरचा जप्त सदर वाहन त्याच्या मालकीचे असल्याबाबतचा पुरावा म्हणून नि.क्र. ०३ सोबत एफ.आय.आर. ची छायांकित प्रत, जप्त गाडीची आर.सी.ची छायांकित प्रत, अर्जदाराचे आधारकार्डची छायांकित प्रत इ. कागदपत्रे सदरकामी सादर केलेली आहेत.

**०७.** अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक असून अर्जदाराची मालकीबाबत इतर कोणीही हक्क सांगितलेला नाही. सदरचे वाहन हे अर्जदारास परत न दिल्यास साहजिकच ते वापरात नसल्याने वापराविना खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार आहे. जरी सहा.सरकारी वकिल यांनी जप्त वाहन अर्जदारास परत करण्याबाबत हरकत घेतलेली असली तरी सदर मुद्देमालाच्या मालकीबाबत इतर कोणीही हक्क सांगितलेला नसल्याचे विचारात घेता व त्याबाबत संबंधीत तपासी अधिकारी यांनी कोणताही सबळ आक्षेप न नोंदविल्यामुळे सदर वाहन वापराविना पडून राहिल्यास निश्चितच ते खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे **'सुंदरलाल अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य, ए.आय.आर.२००३, मा. सर्वोच्च न्यायालय ६३८'** या प्रकरणातील मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन केले असता गुन्ह्यातील जप्त वाहनाचा तात्पुरता ताबा अर्जदाराला काही अटी व शर्तीवर देणे उचित होणार आहे.  सबब, मी खालील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार **राजकुमार ज्ञानबा शिंदे** यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. HONDA CB SHINE कंपनीची दुचाकी असून जिचा रजि.क्र. MH-37-N-7949, चेसिस क्र. ME4JC36KCE7407912, इंजिन क्र. JC36E73334633 गाडी अंदाजे ३०,०००/- रुपये मुददेमाल ३०,०००/- रुपये किंमतीचा बाँण्ड देण्याच्या अटीवर अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावे.

२. अर्जदाराने सदर जप्त मुददेमाल, पो.स्टे. शिरपूर येथील गु.र.नं. क्र. २५२/२०२६ या खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो विक्री अथवा अन्य प्रकारे तबदिली करु नये व त्यामध्ये कोणताही बदल करु नये.

३. ज्या-ज्या वेळी न्यायालय आदेश करेल त्या-त्या वेळी अर्जदाराने सदरचे जप्त मुददेमाल न्यायालयात हजर करावे.

४. येणेप्रमाणे तपासी अंमलदार यांना कळविण्यात यावे.

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2026.06.29 17:44:45 +0530

ठिकाणः रिसोड (पी. व्ही. सपकाळ)

दिनांक: २९.०६.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रिसोड

<u>**शेरा**</u>

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच. ए. उचाडे. |
| निकाल तारीख | : | ०८.०१.२०२६ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०८.०१.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०८.०१.२०२६ |